म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १७२८


# स्वानंदिनी

गुनिदास

गीत-संग्रह

REFBK-0014826
REFBK-0014826

पं. जगन्नाथबुवा पुरोहित
सत्कार समिति, मुंबई १९

# स्वानंदिनी



स्वा नं दि नी

# स्वानंदिनी

गुनिदास

गीत-संग्रह

REFBK-0014826

REFBK-0014826

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........ दि: ........
क्रमांक........ नों दि: ........

पं. जगन्नाथबुवा पुरोहित
सत्कार समिति, मुंबई १९

१३ फेब्रुवारी १९६५

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४.

प्रकाशक :
भास्कर गणेश काकतकर
पं. जगन्नाथबुवा पुरोहित सत्कार समिति
३/४ भूता निवास
डॉ. आंबेडकर रोड
मुंबई १९.

आपल्या असीम वात्सल्यानें, ''फोडिले भांडार'' ह्या वृत्तीनें मला संगीत विद्येचें दान करणारे, आपल्या निर्मळ प्रेरणेनें, मार्मिक प्रोत्साहनानें माझ्या हातून संगीत कलेची वेडीवांकडी सेवा घडवून आणणारे, माझ्या संगीत जीवनाचे कुशल व कसबी शिल्पकार गुरुवर्य पै. खाँसाहेब विलायत हुसेनखाँ ''प्राणपिया'' ह्यांच्या पवित्र स्मृतीला माझी ही पहिली वहिली कलाकृती अत्यंत श्रद्धापूर्वक सादर, सविनय अर्पण......



*" गाऊं गुनन कैसे तुमरो*
*गुन नाहि मोमे अब "*

—गुनीदास

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों दि ..................

# परिचय

पंडित जगन्नाथबुवांच्या षष्ट्यब्दीपूर्तिमहोत्सवाचें निमित्तानें जी परिचयपत्रिका वाटली गेली त्यामध्यें त्यांची ओळख, तें विद्वान जाणकार, गुणी शिष्य, उदार गुरु, उच्च श्रेणीचे गायक आणि सहृदय कवि अशी करून दिली होती. या त्यांच्या गुणसमुच्चयाचें किंचित् दर्शन करून देण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणून समितीनें प्रस्तुत पुस्तिका प्रसिद्ध करण्याचें ठरविलें.

पंडित जगन्नाथबुवांनीं जिवापाड कष्ट करून ठिकठिकाणाहून अमोलिक चिजा पैदा केल्या आणि त्यामध्यें स्वतः निर्माण केलेले रंगदार राग, व काव्यगुणानें नटलेल्या चिजा, यांची भर घालून जें समृद्ध भांडार तयार केलें तें त्यांनीं शिष्यांमध्यें मुक्त हस्तानें वाटलें—व वाटत आहेत. या अमूल्य ठेव्याचा कांहीं भाग या पुस्तिकेमधून संगीतप्रेमी जनतेला उपलब्ध करून देतांना समितीला अत्यंत आनंद होत आहे.

पंडित जगन्नाथबुवांच्या चिजांचें स्वरीकरण करण्याचें अवघड व किचकट काम, श्री. के. जी. गिंडे, प्राचार्य, वल्लभ संगीतालय, शींव, यांनीं मोठ्या प्रेमानें अंगावर घेऊन तें इतक्या उत्तम तऱ्हेनें आणि वेळेनुसार पार पाडलें, म्हणूनच ही पुस्तिका प्रसिद्ध करणें शक्य झालें. त्यांचे आभार आम्हीं काय मानावे ?

पद्मभूषण डॉ. रातंजनकर यांनीं आपल्या टीकात्मक लेखानें, आणि पद्मभूषण प्रा. ना. सी. फडके यांनीं पंडित जगन्नाथबुवांची सहृदय कुंचल्यानें रेखाटलेली व्यक्तिरेषा पुरवून, या पुस्तिकेवर जे साजशृंगार चढविले, याबद्दल समिति त्यांची ऋणी आहे.

श्री. शरद साठे व श्री. परांजपे यांनी मुखपृष्ठाची सजावट केली व मौज प्रिंटिंग प्रेसचे श्री. वि. पु. भागवत यांनी ठरलेल्या वेळेच्या आधींच छपाई केली याबद्दल समिति या सर्वांची आभारी आहे. त्याचप्रमाणें पॉप्युलर प्रोसेस स्टुडिओ, गिरगांव यांनीं विनामूल्य ब्लॉक्स करून दिले त्यांच्या ह्या सहकार्याबद्दल समिति आभारी आहे.

**भास्कर ग. काकतकर**
अध्यक्ष
पंडित जगन्नाथबुवा पुरोहित सत्कार समिति, मुंबई.

दि. १३-२-१९६५

# 'गुणीदास' जगन्नाथबुवा पुरोहित : एक शोभिवंत समृद्ध व्यक्तिरेखा

ना. सी. फडके

७८८२९

माझ्या कोल्हापूरच्या वास्तव्यातल्या संगीतविषयक आठवणी ज्या ज्या वेळेस मी करू लागतो त्या त्या वेळेस अनेक रंगलेल्या मैफली जशा आठवतात, त्याचप्रमाणे संगीताच्या क्षेत्रातल्या ज्या व्यक्तींचा कमीअधिक परिचय मला झाला अशा कितीक व्यक्तीहि आठवतात. या व्यक्तींशी झालेले अनेक सुखसंवाद आठवतात, कुणाच्या गाण्यावाजविण्यातले अनवट राग आठवतात, कुणाची आग्रही मतं आठवतात, बोलण्याचालण्यांतल्या लकबी आठवतात. या ना त्या कारणानं कितीक माणसांच्या आणि प्रसंगांच्या स्मृती माझ्या मनावर कोरल्या गेल्या आहेत.

या स्मृती पुन्हा एकदा आठवून पाहाण्याचा गोड खेळ माझ्या मनानं सुरू केला की प्रत्येक वेळेस धोतराचा सोगा उजव्या पायावर सोडलेला आहे, डाव्या अंगाला छाकटा काचा मारलेला आहे, अंगात व्यवस्थित शर्ट कोट आहे, डोक्याला टोपी आहे—ती टोपी म्हणा किंवा घालण्याची तऱ्हा म्हणा—मुसलमानी वाटते आहे, अशा थाटातली चांगली उंचनिंच, सुदृढ बांध्याची कांहीशा आखाडेबाज ऐटीची एक व्यक्ति माझ्या मनःचक्षूंपुढें अटळपणानं येते. या व्यक्तीचा कांहीसा घोगरा आवाज मला ऐकू येतो, हेल काढण्याची कानडी तऱ्हा जाणवते, आणि या व्यक्तीच्या आग्रहावरून मी एकदा इचलकरंजीला गेलो होतो, पै. विलायतहुसेन खाँसाहेब यांचा गंडा बांधण्याचासमारंभ कुणी तरी केला त्याला हजर राहिलो होतो, आणि शिष्यांच्या हजेरीची लांबण लागून सारी रात्र संपल्यावर बाहेरच्या सृष्टीत उषःकालाची चाहूल सुरू झाली

होती तेव्हा विलायतखाँ गायला बसले आणि असं काही जमून गायले की जन्माची याद राहावी, तो सारा प्रसंग डोळ्यापुढे उभा राहातो.

मला साल नक्की आठवत नाही; परंतु बहुधा १९४५ साली कोल्हापूरच्या 'देवल क्लबा'चा वार्षिकोत्सव झाला. त्या उत्सवात भाग घेण्यासाठी बडे गुलामअल्ली आले होते. ते असे तऱ्हेवाईक आणि लहरबाज कलावंत की ते जलशात गायले एकदाच, परंतु देवल क्लबात उतरले होते तिथे त्यांच्याभोवती अखंड पडलेल्या चाहत्यांच्या घोळक्यात केवळ षोकानं गायले दहादा! ज्या व्यक्तीनं मला आग्रहानं इचलकरंजीला नेलं होतं त्याच व्यक्तीनं माझ्याकडे यावं आणि म्हणावं 'खाँसाहेब गायला बसले आहेत चला.' मी कॉलेजात जायला निघालो असलो तरी कॉलेजला दांडी मारावी, आणि त्या व्यक्तीबरोबर देवलक्लबात जावं, आणि केवळ रसिकांसाठी खुललेल्या खाँसाहेबांच्या प्रतिभेचा अपूर्व विलास बघून तृप्त मनानं घरी यावं....

मला मुद्दाम वर्दी देऊन घेऊन जाणाऱ्या या माणसाची वृत्तीच अशी की आपण स्वतःतर गाणं वाजविणं अखंड ऐकावंच, परंतु जे जे रसिक भेटतील त्याना त्याना त्याचा आनंद लुटण्याची संधि द्यावी. इतरांचं पोट भरलं की या माणसाला तृप्तीचा ढेकर यावी. नादब्रह्माच्या शोधात आणि चिंतनात इतका गढलेला दुसरा माणूस मी बघितला नाही! १९४० साली हा माणूस कोल्हापुरात स्थायिक झाला. पुढे १९५२ साली कोल्हापूर सोडून मुंबईत जाऊन राहिला. या बारा वर्षात कोल्हापूरला ज्या ज्या संगीतविषयक घडामोडी झाल्या त्यात या माणसाच्या श्रमांचा फार मोठा वाटा होता. संगीतविद्येवरचं याचं प्रेम असं अजब की मैफलीच्या यशस्वितेसाठी त्यानं पडेल ते काम करावं. कलावंतांची सरबराई करावी. अंगाखांद्यावर हत्यारं वाहून नेण्याची हमाली देखील हौसेनं करावी!

या माणसाचं नाव जगन्नाथबुवा पुरोहित!

गेल्या सोळा वर्षात जगन्नाथबुवांचं वास्तव्य मुंबईत आहे, माझं वास्तव्य पुण्यात आहे. आमच्या गाठीभेटी फारशा होत नाहीत....परंतु ते मला केव्हाहि भेटले की गप्पागोष्टींना फार मजा येते. संगीतविषयक प्रश्नांवरचे वाद रंगतात, मतप्रतिपादनाच्या फैरी झडतात. परंपरागत आंधळेपणाची झापणं डोळ्यांवरून काढून टाकून मौलिक विचार करण्याच्या त्यांच्या वृत्तीचं मला दर्शन घडतं. त्यांचं कौतुक वाटतं. त्यांच्या मोठेपणाची जाणीव होते....ते निरोप घेऊन

गेल्यावर सुद्धा किती तरी वेळ त्यांचा आवेशयुक्त घोगरा आवाज आणि बोलण्यात मला वरचेवर आढळणारी कानडी छटा माझ्या कानात घुमत राहाते !

एकदा मला राहवेना म्हणून मी बुवांना विचारलं, 'बुवा तुम्ही बेळगाव धारवाडकडचे काय ? नपुंसकलिंगी क्रियापद तुमच्या बोलण्यात वारंवार येतं म्हणून विचारतो' बुवांची विनोदबुद्धी तल्लख आहे. ते हसले आणि म्हणाले, "नाही नाही. बेळगाव-धारवाडकडचा नाही मी. माझं जन्म झालं हैद्राबादला !'.... आणि हे सांगतानाहि आपल्या तोंडून नपुसकलिंगी प्रयोग झाल्याचं त्यांच्या लक्षात आलं, आणि ते दिलखुलास हसले........

जगन्नाथबुवा जन्मले ते एका गरीब भिक्षुकाच्या कुटुंबात. त्यांच्या फार लहानपणीच त्यांची आई वारली, आणि ते अवघे अकरा वर्षांचे होते तेव्हा त्यांचे वडीलहि वारले. त्यांच्या चुलत्यानी त्यांचा प्रतिपाळ केला. परंतु एकंदरीत त्याचं बालपण गरीबीतच गेलं........आज घटकेला बुवांशी गप्पा मारतांना त्यांच्या शिक्षणशून्यतेची शंकादेखील येत नाही. एखाद्या चांगल्या सुशिक्षित माणसाप्रमाणे त्यांचं बोलणं असतं...परंतु खरी वस्तुस्थिती अशी की मराठी तीन इयत्तादेखील बुवा शिकलेले नाहीत. ते सांगतात, 'सही करता येण्यापुरतं माझं लिहिणं वाचणं झालंय.'

परंतु शाळेच्या अभ्यासात जो कधी रमला नाही तो जगन्नाथ लहानपणापासूनच गाण्यावाजविण्याचा वेडा होता ! विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या त्या काळात दक्षिण हैद्राबाद म्हणजे संगीताचं एक मोठं केंद्र होतं. त्या काळात निजामी दरबारात जे कलावंत होते त्यांची यादी करू लागलं तर पाच पंचवीस बडी बडी नावं घ्यावी लागतील....गाण्यावाजविण्यानं गजबजलेल्या वातावरणात जगन्नाथाच्या संगीत-वेडाचा परिपोष सहजासहजी झाला. त्या किशोरावस्थेत देखील जगन्नाथाची वृत्ती अशी की संगीत विद्येतली कोणतीहि चांगली गोष्ट दिसली की तिच्या मागं धाव घ्यावी....संपत्तीची याचना करण्यात कमीपणा असेल, परंतु विद्येची संपत्ति अशी आहे की तिची याचना करण्यात कोणताहि कमीपणा नाही, आणि तिची याचना करणाराला ती मिळाल्याखेरीज राहात नाही.... जगन्नाथबुवांनी संगीतविद्येच्या बाबतीत याचकाचं आणि सेवेचं व्रत जन्मभरच केलेलं आहे. त्याचा प्रारंभ त्यानी लहानपणीच केला होता.... १९२० च्या सुमारास हैद्राबादेत जे मातबर गायक होते त्यांच्यापैकी महमदअलीखाँ आणि शब्बूखाँ यांची मेहेरबानी जगन्नाथानं संपादिली, आणि

गायनविद्येची उपासना केली. त्या वेळेस विख्याती पावलेले बशीरखाँ अधूनमधून हैद्राबादेस येत असत. त्यांचीहि सेवा जगन्नाथानं केली आणि त्यांच्याकडूनहि विद्येचा प्रसाद मिळविला....महमदअली खाँ हे दिल्लीजवळच्या सिकंदरा गांवचे. त्यांची गायकी दिल्ली घराण्याची म्हणून ओळखली जात होती. जगन्नाथाच्या गळयावर पहिले संस्कार झाले ते दिल्ली घराण्याच्या गायकीचे.

...१९२४ साली काँग्रेसचं अधिवेशन बेळगावला झालं. तीस वर्षांचा जगन्नाथ काँग्रेसला गेला तो भारताच्या स्वातंत्र्य लढ्याच्या ओढीनं नव्हे तर संगीताच्या ओढीनं. काँग्रेसच्या बैठकीला जोडून गाण्यावाजविण्याचे कार्यक्रम होणार होते ते ऐकण्याच्या इच्छेनं. पै. विलायत हुसेन खाँ यांचं गाणं जगन्नाथानं प्रथम ऐकलं ते या वेळी; आणि पहिल्या दृष्टिभेटीत प्रेम बसावं त्याप्रमाणे त्यांचं विलायत हुसेन खाँ यांच्या गायकीवर प्रेम बसलं. विलायतखाँचं गाणं ऐकताना त्याला वाटलं, या गायकीत काहीतरी विशेषआहे. ही गायकी मिळविली पाहिजे...जगन्नाथ बेळगावाहून परत गेला तो विलायतखाँच्या गाण्यानं भारावलेल्या अवस्थेतच !

१९३२ मध्ये महमदअली खाँ पैगंबरवासी झाले. पुढे चार पाच वर्षांनी शब्बूखाँहि निवर्तले. मध्यंतरीच्या काळात विलायत हुसेन खाँ यांची गाटभेट जगन्नाथानं घेतली होती आणि आपल्या सेवावृत्तीच्या बळावर त्यानं त्यांना प्रसन्नहि करून घेतलं होतं. म्हैसूरला, बेळगावला, मुंबईला, जिथे कुठे त्यांचा मुक्काम असेल तिथे जगन्नाथानं धाव घ्यावी, विलायतखाँच्या सान्निध्यात राहावं, त्यांची सेवा करावी, विद्येची मिळेल ती धनदौलत गाठी मारावी, असा क्रम चालला होता. महमदअलींचं देहावसान होण्यापूर्वी त्यांनी जगन्नाथाला सांगितलं होतं, 'मी काही तुला फार विद्या दिली असं नव्हे, परंतु थोडी दिली आहे. दुसऱ्या कुणा गुरूकडे तू गेलास तर तुला संगीतसाधना करता येईल, इतकी योग्यता तुझ्या अंगी आली आहे. कुणाकडे जावंसं वाटतं तुला? कुणाची गायकी तुला आवडते?'...जगन्नाथानं विलायत हुसेन खाँ यांचं नाव सांगितलं. ते ऐकून महंमदअली म्हणाले 'चांगली निवड आहे तुझी. विलायतखाँकडे अवश्य जा.'

आपल्या पहिल्या गुरूचा आशीर्वाद घेऊन जगन्नाथ विलायतहुसेन खाँ यांच्याकडे गेला. त्यांनी त्याला आपला म्हटलं खाँसाहेब आणि जगन्नाथ यांच्यात गुरु-शिष्य संबंध निर्माण झाला, तो थोडी थोडकी नव्हे पुढे जवळजवळ पस्तीस वर्षं टिकला. आणि नुसताच टिकला नाही, तर या संबंधाला असं काही गाढ आणि

अनुक्रम.................... दि: ....................
.................... नों दि ....................

मधुर स्वरूप आलं की त्याची कहाणी एखाद्या सुंदर काव्याचा विषय व्हावी!....

गवयांच्या दोन जाती आहेत. आपल्याजवळच्या विद्याधनाचं कंजुषपणानं जतन करणाऱ्या, आपली विद्या कुजून गेली तरी चालेल परंतु दुसऱ्याच्या हाती ती जाता कामा नये असा विचार करणाऱ्या गवयांची एक जात; आणि दुसरी जात अशा गवयांची की आपल्या विद्येचं सत्पात्री दान सढळ हातानं करावं असं ज्याना मनापासून वाटतं त्यांची! विलायतहुसेन खाँ दुसऱ्या जातीतले. त्याचा सहवास ज्यानी ज्यानी जोडला, मग ते त्यांचे गंडा बंद शिष्य असोत किंवा त्यांचं साक्षात् शिष्यत्व ज्यांनी पत्करलं नाही असे गायन प्रेमी असोत, त्या सर्वांची एकमुखी साक्ष अशी पडेल की विलायतखाँसारखा सढळ हाताचा विद्येचा दाता दुसरा कुणी झाला नाही. विद्या हे धन असं आहे की जे दिल्यानं कमी होत नाही उलट वाढतं, अशी खाँसाहेबांची समजूत होती आणि त्यांच्याजवळ विद्वत्तेची इतकी गडगंज संपत्ति होती की हयातभर मुक्तहस्तानं उधळपट्टी करून सुद्धा कितीतरी अपरंपार जडजवाहर त्यांच्याजवळ शिल्लकच राहिलं...अशा प्रकारचा उदारधी गुरु जगन्नाथबुवांच्या भाग्यानं त्याना लाभला. मग या गुरूची किती सेवा जगन्नाथबुवानी केली असेल त्याचं वर्णन काय करावं? खाँसाहेबांच्या ठिकाणची त्यांची भक्ति इतक्या पराकोटीची होती की पुराणांतरीच्या ज्या कथा आपण वाचतो त्यातल्या एखाद्या गुरुप्रमाणे खाँसाहेबांनी म्हटलं असतं, 'जगन्नाथ, तुझी मान कापून माझ्यापुढे ठेव!' तर जगन्नाथ बुवानी क्षणाचाहि विलंब न लावता आपल्या शिरकमलाचा नजराणा त्यांच्यापुढे ठेवला असता!....

खाँसाहेबांकडून तालीम घेण्याच्या काळातहि त्यांचं आणि जगन्नाथबुवांचं कायमचं एकत्र वास्तव्य नव्हतं. जगन्नाथबुवाना स्वतःच्या योगक्षेमासाठी स्वतंत्रपणानं उद्योग करणं भाग होतं. आता दुसऱ्याना तालमी देण्याइतपत त्यांची तयारी झाली होती, इतकंच नव्हे, तर अध्यापनातल्या कौशल्याबद्दल त्यांचा लौकिक झाला होता, आणि त्याना पुष्कळ शिकवण्या मिळू लागल्या होत्या. विलायतखाँ आपल्या उद्योगानिमित्त एकीकडे, तर आपल्या शिकवण्यात अडकलेले जगन्नाथबुवा दुसरीकडे, अशी फारकतच बहुधा नेहमीची असायची. मग सटी साहामासी मुंबईत किंवा इतर कुठे तरी गुरुशिष्यांची युति घडायची. आणि ती घडली म्हणजे मात्र शिकणारानं आणि शिकविणारानंहि मध्यंतरीच्या उपासाचा आणि ताटातुटीचा भरपूर वचपा काढून घ्यायचा.

ताटातुटीच्या दिवसातहि खाँसाहेबांचा आणि जगन्नाथबुवांचा पुष्कळ पत्रव्यवहार चालायचा. प्रेमानं किंवा भक्तीनं माणूस झपाटलं की पत्रलेखनाची कला त्याला आपोआप सुचते. शाळाकॉलेजातल्या शिक्षणावाचून काही अडत नाही. जगन्नाथबुवानी खाँसाहेबाना वारंवार पत्रं लिहावी, आणि त्या पत्रातून त्यांच्याशी खूप खूप बोलावं. ते नुकतेच भेटून गेले असले तर त्या भेटीत आपल्याला किती आनंद झाला त्याचं वर्णन त्यानी करावं. भेटून फार दिवस झाले असतील तर आता केव्हा भेटता अशी व्याकुळ हाक मारावी. कधी खाँसाहेबांचं पत्र पोचल्याच्या आनंदानं गोड गोड पत्र लिहावं; कधी वास्तविक थोडेच दिवस झाले असले तरी त्यांच्या भुकेल्या मनाला ते फार वाटावे आणि त्यानी खाँसाहेबाना पत्रातून विचारावं, 'माझा कोणता गुन्हा घडला म्हणून असे निष्ठुर झालात?'....

खरोखर, जगन्नाथबुवांच्या गुरुभक्तीच्या नानाविध विलासांचं दर्शन घडविणारी ही पत्रं पाहिली की मनात येतं, राधाकृष्णांच्या प्रेमाचीच ही एक वेगळी तऱ्हा नव्हे काय?....खांसाहेबांच्या सहवासासाठी आणि विद्येच्या प्रसादासाठी आसुसलेल्या जगन्नाथबुवांच्या अंतःकरणातील हर्षरोषादि जे भावतरंग त्यांच्या पत्रातून उठत असत, त्याकडे बघितलं की कन्हैयाला साद घालणाऱ्या मीराची आठवण होते. पंढरीच्या विठूला आळविणाऱ्या तुकोबाची याद येते.... संगीतक्षेत्रातल्या गुरु-शिष्य-प्रेमाच्या पुष्कळ आख्यायिका मी ऐकल्या आहेत. शिष्यानं केलेली सेवा आणि गुरूच्या ठायी ठेवलेली अन्यय भक्ति यांचे कितीक किस्से माझ्या संग्रही आहेत. परंतु जगन्नाथबुवांच्या निष्ठेला आणि गुरुप्रेमाला तोड सापडण्यासारखी नाही.

आणि शिष्याच्या भक्तीची अपूर्वाई गुरूनंहि ओळखली होती. जगन्नाथबुवा स्वतःला समजत होते आणि म्हणवीत होते 'दास'! सेवक! चाकर! 'शिष्य' ही संज्ञादेखील त्यानी आपल्या योग्यतेच्या पलीकडची मानली! परंतु जगन्नाथबुवांच्या भावोत्कट भक्तीनं भारावलेले विलायतखाँसाहेब येवढे मर्मज्ञ आणि हृदयानं श्रीमंत, की त्यानी जगन्नाथबुवाना शिष्याच्याहि वरचं स्थान दिलं. आपल्या प्रत्येक पत्रात ते जगन्नाथबुवाना 'प्रिय बंधु' असं संबोधीत असत.....खाँसाहेब आणि जगन्नाथबुवा यांच्या परस्पर संबंधाचा जेव्हा जेव्हा मी विचार करतो, तेव्हा तेव्हा मनात असं येतं, की मातापित्यांच्या सेवेत असलेल्या 'पुंडलिका भेटी परब्रह्म आले गा!', परंतु पुंडलिकानं फेकलेल्या 'विटे'वर ते

'ध्यान' 'युगे अठ्ठावीस' उभं राहायला तयार झालं, त्याप्रमाणे विलायतखाँसाहेब कधी वेळ आली असती तर, उभे राहिले असते खचित !

विशेष आनंदाची गोष्ट ही की जगन्नाथबुवांच्या या गुरुप्रेमामुळे व्यक्तिशः त्यांचा फायदा तर झालाच, खाँसाहेबांजवळून त्यांना विद्येचं भांडार तर मिळालंच, परंतु संगीतविद्येचाहि फायदा झाला. जगन्नाथबुवा रचनाकार बनले!...त्यांची गुरुभक्ति केवळ पत्रातच व्यक्त होऊन राहिली नाही, तर ती नव्या नव्या रचनांच्या रूपानं आविष्कृत होऊ लागली....विलायतखाँसाहेबानी स्वतःच्या कल्पकतेनं अनेक रागरचना केल्या होत्या. त्या करताना 'प्राणपिया' असं नाव त्यानी धारण केलं होतं. प्रत्येक स्वरचित चिजेत त्यानी या नावाची योजना केली होती....गुरूच्या पावलावर पाऊल टाकून नव्या रचना करताना जगन्नाथबुवांनी 'गुनीदास' असं नम्र नाव धारण केलं!....खाँसाहेबांच्या सहवासातला आनंद, त्यांच्या विरहातलं दुःख, असे जगन्नाथबुवांच्या अंतःकरणाचे भावतरंग एकेका नव्या रागरचनेचा आकार घेऊ लागले....

ही रागरचना करताना जगन्नाथबुवानी एक महत्त्वाचा कटाक्ष पाळला. प्रचारात नसलेले नवे नवे मिश्रराग तरी बनवायचे, किंवा प्रचलित रागापैकी एखाद्या रागात 'द्रुत' मधली चीज नसेल तर ती बांधायची....१९४२ मध्ये त्यानी पहिली चीज बांधली ती 'मारुविहाग' रागात 'द्रुत' एकतालातली चीज नव्हती ती असावी म्हणून. 'गाऊ गुनन कैसे तुमरो' अशा प्रारंभाची ती चीज होती.

नवीन चिजा बांधण्याचा आपला छंद बुवानी गुरुपासून किती दिवस लपवून ठेवला होता कुणास ठाऊक, परंतु ते रहस्य जेव्हा खाँसाहेबांजवळ उघड झालं तेव्हा त्याना विस्मय वाटला आणि आनंदहि झाला. जुन्या चिजातलेच इकडचे तिकडचे तुकडे एकत्र जोडून नवी चीज बांधल्याचा दावा सांगणारे पुष्कळ गायक असतात. जगन्नाथबुवा अशा सवंग उद्योगात पडले नव्हते. त्यांनी बांधलेल्या चिजात नवी स्वतंत्र रचना होती. रागिणीचं स्वरूप अगदी स्पष्ट ठेवणं, स्वरांचा छायाप्रकाश साधणं, वादी संवादी स्वरांचा उठाव करणं, अस्ताई आणि अंतरा यातले संबंध साधणं, चिजेचं तोंड चमत्कृतिपूर्ण ठेवणं, इत्यादी सगळी अवघड पथ्यं कौशल्यानं संभाळून नवी चीज बांधण्याची अवघड करामत बुवांच्या प्रत्येक चीजेत दिसून येत होती. आपल्या नव्या रचना बुवानी गाऊन दाखविल्या त्या ऐकून खाँसाहेब साहजिक फार संतुष्ट झाले. कितीक

रचनात बुवानी असा प्रयत्न केला होता, की 'ख्याला' त एक प्रश्न विचारलेला असावा, आणि 'द्रुत' मधे त्या प्रश्नाचं उत्तर दिलेलं असावं. मात्र बहुतेक चिजात आपल्या गुरूशी बुवा बोलत होते. त्यांचं गुणवर्णन करीत होते, त्यांचा कृपाप्रसाद मागत होते, 'तुम गुनसागर,' 'गुनसमुद्र' 'गुणवंत' अशी विशेषणं चिजात वारंवार वापरली होती. ती बघून खाँसाहेबानी बुवाना विचारलं, 'माझं असं वर्णन कशाला करता? मी गुनसागर आहे काय? हे शब्द काढाल तर बरं होईल.' बुवानी हात जोडले आणि म्हटलं, 'हे शब्द कसे काढू? आपल्याविषयी माझी जी प्रामाणिक भावना आहे ती व्यक्त करायला हे शब्द हवेतच!'....हे ऐकून खाँसाहेब हसले आणि म्हणाले, ठीक आहे.

जगन्नाथबुवानी बांधलेल्या नव्या चिजात कितीक अशा आहेत की त्यात त्यानी मोठ्या कौशल्यानं नवे मिश्रराग बनविले आहेत. विलंबित एकतालातली 'सुघर बर पायो' आणि द्रुत त्रितालातली 'पीर पराई जानी नही बालमवा' ही चीज—अशा दोन चिजा बुवानी नव्या रागात बांधल्या. ह्या रागाला त्यानी 'कौशिक' असं नाव दिलं होतं. परंतु पुढे ते बदलून 'जोग-कंस' असं नाव त्यानी दिलं. तेच नाव आता प्रचलित आहे. १९५१ साली एका मैफलीत कुमार गंधर्वानी बुवांची ही रागिणी म्हटली, आणि ती ऐकून सारे श्रोते स्मितित झाले, तृप्त झाले. तेव्हापासून कुमार गंधर्वांचा 'जोगकंस' हातखंडा राग ठरून गेला. इतर गायकहि हा राग गाऊ लागले....आता 'जोगकंस' या रागाला चोखंदळ श्रोत्यांच्या अंतःकरणात कायमचं स्थान मिळालेलं आहे....'रागाची निर्मिती केली मी, परंतु तो लोकप्रिय केला कुमार गंधर्वानी व माझ्या इतर शिष्यानी—'असं बुवा प्रांजलपणानं आणि अभिमानानं सांगतात.

बुवानी निर्मिलेला दुसरा एक नवा मिश्र राग असाच गाजला आहे. हिंदोली, भटियार, बिहाग अशा तीन रागिणींचं मिश्रण करून बनविलेल्या या रागाला बुवानी नाव दिलं आहे 'स्वानंदी'. धीम्या त्रितालातल्या या चिजेचा आरंभ आहे. 'जियरा मानत नाही, तुमबिन मोरे मनभावन'. बुवांचे एक आवडते शिष्य सी. आर. व्यास यानी बुवांची ही रागिणी उत्कृष्टपणे गाऊन गाजविली आहे.

जीवनपुरी आणि भैरव यांचं मिश्रण करून बुवानी बनविलेला 'जौन-भैरव' हा रागहि असाच लोकप्रिय झालेला आहे. बुवांचे दुसरे शिष्य श्री. राम मराठे ह्यांचा हा राग रंगविण्यात हातखंडा आहे.

गेली बावीस वर्षं नवे नवे मिश्रराग तयार करण्याची आणि प्रचलित रागात नवीन चिजा बांधण्याची जगन्नाथबुवांची ही उपासना अखंड चाललेली आहे. विलायत खाँसाहेबांच्या हयातीत त्यानी सुमारे ६० रचना केल्या होत्या, आणि त्या साऱ्या खाँसाहेबाना दाखविल्या होत्या. अशा १०१ रचना करण्याचा संकल्प त्यानी सोडला होता. १९६३ च्या मार्च महिन्यात जगन्नाथबुवांचा सत्कार करण्याची योजना कोल्हापूरच्या मंडळीनी केली होती. परंतु १०१ नव्या चिजा बांधण्याचा संकल्प पूर्ण झाल्याखेरीज स्वतःचा सत्कार करून घेणं बुवाना प्रशस्त वाटलं नाही, म्हणून कोल्हापूरकरांची ती योजना तशीच राहिली. आता बुवानी आपला संकल्प पूर्ण केला आहे!

काही वर्षापूर्वी एकदा असं झालं की बेळगाव, धारवाड हुबळी अशा ठिकाणच्या लोकानी योजलेल्या संगीतोत्सवात विलायतहुसेन खाँ यांच्या गायनाचा कार्यक्रम ठेवण्याची उत्सवाच्या चालकांची इच्छा होती. जगन्नाथबुवांच्यामार्फत खाँसाहेबाना आमंत्रण दिलं की ते हमखास स्वीकारलं जातं हे ओळखून चालकानी बुवांची मध्यस्थी मागितली. बुवा काय? खाँसाहेबांसाठी धावाधाव करायला मिळावी म्हणून निमित्ताला टेकलेलेच! त्यानी सारी खटपट करून खाँसाहेबाची गाणी ठरवून दिली, आणि पहिला जलसा बेळगावला होता म्हणून तिथे जाऊन बसले. परंतु ज्या आठवड्यात कार्यक्रम होता त्याच आठवड्यात पोस्टाचा संप झाला. बुवांची पत्रं, तारा खाँसाहेबाना मिळाल्या नाहीत, आणि खाँसाहेबांच्या तारा, पत्रं बुवापर्यंत पोचू शकली नाहीत. खाँसाहेब काही बेळगावला येऊ शकत नाहीत असं मनाशी ठरवून बुवा कोल्हापूरला परत आले. परंतु नंतर बुवाना कळलं की खाँसाहेब ठरल्याप्रमाणे बेळगावला आले होते, त्यांचा कार्यक्रम झाला होता, आणि ते फार चांगलं गायले होते....ही वार्ता ऐकल्यावर बुवांचं दुःख काय विचारता? खाँसाहेब चांगलं गायले, आणि त्यांचं असं जमलेलं गाणं आपण ऐकलं नाही! छे! छे! काय म्हणावं या दुर्भाग्याला?....

त्याना चैन पडेना, अन्न गोड लागेना. डोक्यावरून पांघरूण ओढून घेऊन ते निजून राहिले....मध्यरात्रीच्या सुमारास देवलक्लबातल्या त्यांच्या खोलीचं दार वाजलं. बाहेर पाऊस धो धो पडत होता. दाराची कडी वाजली म्हणून बुवा उठले. त्यानी दार उघडलं, आणि ते पाहातात तों समोर खाँसाहेबांची मूर्ति उभी....त्यानी खाँसाहेबाना आत घेतलं. सरबराई केली.

आणि त्यांच्यापुढे ते बसले ते डोळयातून अश्रूंच्या धारा सांडीतच....'तुम्ही इतके चांगले गायलात आणि मी ते ऐकलं नाही. मला न कळविता बेळगावला गेलात ? माझ्यावर अशी इतराजी का केलीत ?' अशा उद्गाराबरोबर हुंदके देतच !....त्यांची आणि खाँसाहेबाची चुकामूक झाली यात खाँसाहेबाचा दोष नव्हता, पोस्टाच्या संपाचा होता, हा विचार मानायलाच बुवा तयार नव्हते !

खाँसाहेबानी त्यांची खूप समजूत घातली तेव्हा त्यांच्या दुःखाचा आवेग थोडा ओसरला....मग त्यानी एक कागद काढला आणि तो खाँसाहेबांच्या हाती देऊन म्हटलं, 'यात काय लिहिलंय ते वाचा....' खाँसाहेबानी बघितलं तों बुवानी बांधलेली एक नवी चीज त्या कागदावर लिहिली होती. बेळगावच्या जलशात खाँसाहेब गायले होते आणि आपण मात्र ते गाणं ऐकायला हजर नव्हतो याबद्दलचं दुःख त्या चिजेत सांगितलं होतं.

**'प्राणपिया तू ऐसे निठुर भये**
**गुनीदासकी सारी आस गमाई !'**

जगन्नाथबुवानी बांधलेल्या बहुसंख्य चिजात ते खाँसाहेबाशी बोलताहेत. कधी आनंदानं, कधी रागानं, कधी हसतखेळत, कधी रुसून फुगून. खाँसाहेबांचं गुणवर्णन करणाऱ्या कितीतरी चिजा आहेत....आपल्या शिष्याची ही भक्ति आणि प्रेम बघून आपणहि त्याच्यावर एखादी चीज बांधावी असं खाँसाहेबाना वाटलं नसतं तर तेच आश्चर्य म्हणावं लागलं असतं. 'साचि गुननकी सेवा करत वोही' अशा आरंभाची पटदीपक रागातली मोठी सुंदर चीज खाँसाहेबानी बांधली आणि ती एका मोठ्या मैफलीत म्हटलीही !

बुवानी निर्मिलेले राग आणि त्यानी बांधलेल्या चिजा, यांचं संगीत-शास्त्राच्या दृष्टीनं मूल्यमापन करण्याचा माझा अधिकार नाही. परंतु या बाबतीत रसिक श्रोत्यांची भरपावती बुवाना मिळालेली आहे. काव्याच्या कसोटीनं बुवांच्या चिजा पाहाताना त्यातले दोन दोष मला जाणवतात. एक दोष असा, की आशयाची विविधता त्यात नाही. आपल्या प्रिय गुरूचं गुणवर्णन आणि त्याच्याशी वेगवेगळया प्रसंगी केलेला संवाद यातच रचनाकार नित्य रमलेला दिसतो. यामुळे चिजांच्या विषयावर मर्यादा पडलेली आहे. आशयाच्या दृष्टीनं तोचतोचपणा फार आलेला आहे. चिजांचं सौंदर्य कमी झालेलं आणि दुसरा दोष असा की साऱ्या चिजात तेच तेच शब्द इतके वारंवार आलेले आहेत की

त्यांतलं नाविन्य संपून त्याना शिळेपणा आला आहे....सदारंग आणि अदारंग यांनी बांधलेले जे ख्याल गवयांच्या तोंडून आपण ऐकतो, त्यात स्वररचनेची मौज तर भरपूर आहेच, पण शिवाय अर्थाचं सौंदर्य, शब्दाचं सौष्ठव, क्वचित कल्पनेची भरारी, क्वचित भावनाविलास, अशा अलंकारानी ते ख्याल किती नटलेले आहेत ! ते ख्याल संगीतातच नव्हे तर साहित्यातहि मान्यता पावावेत अशा दुहेरी योग्यतेचे आहेत....जगन्नाथबुवांच्या चिजा स्वरसौंदर्यानं नटलेल्या असतीलहि, परंतु साहित्य म्हणून त्यांचा दर्जा फारसा उंच नाही. जेमतेम तीन इयत्ता शिकलेल्या जगन्नाथबुवानी नव्या चिजांची रचना करावी या गोष्टीचं कौतुक करावं तेवढं थोडंच होईल. परंतु ते करताना असं म्हणायला प्रत्यवाय नसावा, की काव्याच्या दृष्टीनं बुवांच्या चिजांत अधिक गुणवत्ता असती तर माझ्यासारख्या त्यांच्या चाहत्यांना अधिक आनंद झाला असता....नवे राग बनविण्याचा आणि नव्या चिजा बांधण्याचा उपक्रम हल्ली जो तो विख्यात गायक करीत आहे, म्हणून असा प्रेमाचा इशारा देऊन ठेवावासा वाटतो, की नव्या चिजाना 'बे घडीची मौज' येवढीच किंमत राहू नये, त्याना थोडाफार तरी चिरस्थायीपणा यावा, अशी इच्छा असेल तर संगीत आणि साहित्य या दोन्ही दृष्टीनी त्या चिजा सरस वठतील अशी दक्षता घ्यायला हवी.

'ब्रह्मज्ञानासाठी प्रयत्न करणारा हजारात एखादा, आणि यज्ञ करणाऱ्या अशा हजारापैकी यश मिळविणारा एखादाच' अशा आशयाचा उद्‌गार भगवद्‌गीतेत एके ठिकाणी आहे. हा उद्‌गार साऱ्याच विद्याना लागू आहे. अर्थात् संगीतालाहि ! तो लक्षात घेतला असता जगन्नाथबुवानी जे सन्मानाचं स्थान आज प्राप्त करून घेतलेलं आहे, त्याची अपूर्वाई लक्षात येते. गाण्यात काय, कोणत्याहि विद्येत काय, हौसेदाखल शिरणारे हजार, खंबीरपणानं ठरणारा एखादा. शिकणारे हजार, टिकणारा एखादाच ! आणि अशा टिकणारापैकी देखील धोपट मार्गानं जाणारे हजार, तर स्वतंत्र प्रज्ञेची चमक दाखविणारा एखादाच ! दारिद्र्याची प्रतिकूलता पचवून विद्यार्थ्याची भूमिका तर जगन्नाथबुवानी उत्कृष्टपणे पार पाडलीच, परंतु गुरूची भूमिकादेखील त्यानी चोखपणानं बजावून दाखविली आणि कर्तृत्वाच्या, या दोनच पायऱ्या चढून त्यानी विश्रांती घेतलेली नाही. तिसरी एक पायरी ते चढून गेले आहेत. रचनाकार म्हणून त्यानी स्वतःसाठी स्वतंत्रस्थान निर्माण केलेलं आहे. त्यांच्या रचना मोठ्या मोठ्या मैफलीत आज गाइल्या जात आहेत !...ज्याला संध्याकाळच्या जेवणाची भ्रांत

होती परंतु महमदअलीखाची शागीर्दी करून जो यमन रागाचे पलटे घटवीत होता, तो अल्पवयी जगन्नाथ आज केवढ्या लोकादराचा आणि यशाचा धनी झालेला आहे! जगन्नाथबुवांची ही वाटचाल खचित अशी आहे की जी पाहून दुनियेनं आश्चर्य करावं, आणि संगीताच्या नव्या उपासकाना स्फूर्ति मिळावी.

ही वाटचाल करताना बुवानी काय काय केलं ते तपशीलवार सांगण्याची ही जागा नव्हे. एवढंच सांगतो की दोन गुणांचं येवढं मोठं भांडवल या माणसानं पहिल्यापासून जवळ बाळगलं होतं की कितीहि अडचणी आल्या, संकटं आली, तरी त्यातून यशाचा मार्ग सापडावा. 'लक्षाधीशाला जे साधणार नाही ते भिक्षाधीश साध्य करू शकतो' अशी एक म्हण आहे. जगन्नाथबुवांच्या लहानपणी विद्या विकत घ्यायला त्यांच्याजवळ संपत्तीचं बळ नव्हतं. परंतु देव जसा भावाचा भुकेला असतो तशीच विद्येची देखील गोष्ट आहे. तिच्याविषयीचा ज्याचा भाव दृढ आहे त्याला ती मिळते! नव्हे, त्यालाच ती खरीखरी मिळते. संगीतविद्येवरची अमाप आणि अतूट भक्ति, आणि ज्याच्या ज्याच्या ठिकाणी ती विद्या दिसेल त्याला सेवेनं आणि कष्टानं प्रसन्न करण्याची प्रतिज्ञा, हे दोन गुण जगन्नाथबुवांच्या एकूण चरित्राचे स्थायीभाव म्हणावे लागतील. त्यांच्या यशोमंदिराचे हे दोन आधारस्तंभ आहेत!

बुवांच्या अंगच्या या दोन गुणांच्या किती हकीगती सांगाव्या? पुष्कळ सांगता येतील. या ठिकाणी एक हकीगत सांगण्याचा मोह आवरत नाही.

गोष्ट आहे १९३६ सालची. जगन्नाथबुवा त्यावेळेस होते ३२ वर्षांचे. ते कोल्हापुरात स्थायिक झाले नव्हते, परंतु एकदा काही कारणानं त्यांचा मुक्काम कोल्हापूरला होता. शालिनी सिनेटोनशी स्पर्धा करण्यासाठी कोल्हापुरात छत्रपति सिनेटोन नावाची फिल्मकंपनी निघाली होती. सांगलीचे आण्णासाहेब माईणकर संगीत दिग्दर्शक म्हणून त्या कंपनीत राहिले होते. त्यानी ऑर्केस्ट्रासाठी माणसं जमा केली होती, त्यांत गुलाम महंमद नावाचे एक सारंगिये होते. माणूस आपल्या कामात मोठा वाकबगार, परंतु वेष असा गबाळा आणि चेहरामोहरा असा बावळा की पाहाणाराला त्याच्या अंगच्या कलागुणांची शंकादेखील येऊ नये. देवलक्लब म्हणजे कोल्हापुरांतलं गाण्यावाजविण्याचं एक महत्त्वाचं केंद्र. गायनप्रेमी लोकांचा अड्डा. तिथे हे गुलाम महंमद येऊन बसायचे, परंतु त्यांच्याकडे विशेष लक्ष कुणी कधी दिलं नाही....एकदा संध्याकाळच्या वेळेस जगन्नाथबुवा गायला बसले होते. पूरिया गात होते. गुलाम महंमद जवळ बसले होते. ते

मधेच खेकसून जगन्नाथबुवाना म्हणाले, 'अबे, जरा ठीक गाओ!'....परंतु जगन्नाथबुवानी त्यांच्या खेकसण्याकडे लक्ष दिलं नाही. आपल्या तऱ्हेनं ते गात राहिले. तेव्हा आवाज आणखीच उंच चढवून गुलाम महंमदनी त्याना दम भरला, 'अरे बेट्या, निषाद जरा ठीक लाव. पूरियाची चेष्टा करतोस की काय?' जगन्नाथबुवा रागानं म्हणाले 'मी गवई आहे. तू सारंगिया आहेस. मला नको शहाणपणा शिकवूस. चूप बसून ऐक'....गुलाम महंमदनी बुवांच्या हातचा तंबोरा काढून घेतला, जुळविला, आणि गायला आरंभ केला....मग जगन्नाथ-बुवांच्या लक्षात आलं की निषाद लावण्याच्या बाबतीत आपली चूक होत होती खरी. ते लक्ष देऊन ऐकू लागले. आणि त्याना असंहि वाटायला वेळ लागला नाही की अरे, केवढ्या उंच दर्ज्याचं गाणं आपण ऐकून राहिलो आहोत. हा फार मोठा कलावंत आहे! याला आपण क्षुल्लक समजलो, ही फार मोठी गलत झाली आपल्या हातून. याचे पाय धरून माफी मागितली पाहिजे. इतकंच नाही तर या विद्वान कलाकाराकडून काही मिळालं तर घेतलं पाहिजे.... परंतु गुलाममहंमदनी गाणं संपविलं, तंबोरा बुवांच्या अंगावर फेकल्यासारखाच केला, आणि ते उठले ते तरातरा चालतेच झाले. बुवांना एक शब्दसुद्धा बोलायला त्यानी अवसर दिला नाही!....

पुढे कितीतरी दिवस बुवांची आणि त्यांची गाठभेट झाली नाही... चौकशी केल्यावर बुवाना कळलं होतं की गुलाम महंमद म्हणजे कुणी साधी असामी नव्हती. पंजाबमधील तलवंडी गावच्या महशूर ध्रुपदी घराण्यातले ते एक गाजलेले कलावंत होते. कुणा गायिकेच्या प्रेमात सापडले होते. तिची सारंगीवर साथ संगत करू लागले होते. पुढे प्रेमभंगाचं दुःख त्यांच्या वाट्याला आलं होतं. निराश झालेला आणि वैतागलेला हा कलावंत परत गाण्याकडे वळला नव्हता. सारंगी हातात घेतली होती ती त्यानं तशीच ठेवली होती. लोक आपल्याला सारंगिया समजतील याची त्याला पर्वा उरली नव्हती. पोटासाठी कुठे तरी उद्योग करावा, गांजा, भांग, चंडोल, दारू अशा व्यसनांच्या पंचद्रव्यात सारी होष बुडवून निराशेनं जड झालेलं जीवन जगावं, अशी त्यांची वृत्ति बनली होती.... ही हकीगत समजल्यावर बुवाना फारच चुटपुट लागून राहिली की अरे, असा हा विद्यासागर आपल्याला भेटला आणि आपण कोरडे राहिलो. त्याच्याकडून काही घेतलं नाही!....आता पुन्हा गाठभेट झाली की चुकीची दुरुस्ती केली पाहिजे.... परंतु त्यांच्या गाठीभेटीचा योग काही केल्या येईना....बुवा फार कष्टी झाले....

...परंतु नंतर एके दिवशी अकस्मात् एक माणूस बुवांकडे आला आणि म्हणाला 'गुलाममहंमदनी तुम्हाला ताबडतोब बोलावलं आहे. असाल तसे या म्हणून सांगितलं आहे'....बुवा चकित झाले, आणि त्या माणसाबरोबर निघाले ....कोल्हापुरात रविवारचा बाजार म्हणजे मोठा गर्दीचा दिवस असतो. एकदा बाजाराच्या दिवशी गुलाम महंमद रस्त्यानं जात होते तोंच एका गाडीचा बैल उधळला आणि गाडीचं चाक खाँसाहेबांच्या पावलावरून गेलं. पाय सुजला. दुखणं विकोपाला गेलं. शेजाऱ्यापाजाऱ्यानी उपचार केले. जेवू खाऊ घातलं. शुश्रूषा केली....ही हकीकत ऐकल्यावर जगन्नाथबुवाना फार वाईट वाटलं. निरोप आणणाऱ्या माणसाबरोबर ते निघाले ते धावतच गेले.

खाँसाहेब त्याना म्हणाले, 'तुझी आठवण का झाली आणि तुला का बोलावलं सांगू? अरे, ही माणसं माझं औषधपाणी बघतात, मला खायला घालतात. परंतु येवढ्यानं माझं कसं भागणार? मी व्यसनी माणूस. मला दारू हवी. चंडोल हवा. या गोष्टी हे लोक थोडेच देणार आहेत मला? म्हणून तुला बोलावलं'....जगन्नाथबुवानी त्याना सांगितलं, 'आपण काही चिंता करू नका. आपल्याला काही कमी पडू देणार नाही मी.'

आणि बुवानी त्यांची सर्व प्रकारची सेवा सुरू केली. चंडोलाची गोळी तयार करावयाची म्हणजे केवढी खटपट करावी लागते! परंतु ती सारी खटपट बुवानी करावी. खाँसाहेबांच्या साऱ्या व्यसनी गरजा भागविताना त्यानी लेशभरसुद्धा आळस करू नये....मनातली इच्छा एकच की एका महान कलावंताची सेवा करण्याचं भाग्य वाट्याला आलेलं आहे, सेवेत कसूर होऊ द्यायची नाही....

खाँसाहेब बरे झाले....मग त्यानी एक दिवस जगन्नाथबुवाना विचारलं, 'तुला काय देऊ'?...ज्या प्रश्नाची बुवा मनोमन वाटच बघच होते तो हा प्रश्न ऐकल्याबरोबर बुवाना परमावधीचा हर्ष झाला. सेवेचं आणि कष्टाचं सार्थक झाल्यासारखं वाटलं. त्यानी हात जोडले आणि ते म्हणाले, 'आपल्याकडून एखादा ख्याल मिळाला तर धन्यता वाटेल मला'....मग गुलाम महंमदखाँसाहेबानी आपलं भांडार उघडलं....

गुलाम महंमद यांच्याकडून मिळालेलं पटदीपक रागातलं एक ध्रुपद पुढे विलायतखाँसाहेबांची भेट झाल्यावर बुवानी त्याना म्हणून दाखविलं तेव्हा ते चकित झाले. त्यानी विचारलं, 'अरे इतकी खूबसूरत वस्तु कुठे पैदा केलीस

तू!' फैय्याजखाँ देखील बहोत खूष झाले. आणि बुवानी जेव्हा गुलाम महंमदची हकीकत सांगितली तेव्हा त्या दोघाहि थोर कलावंतानी गुलाम महंमद म्हणजे केवढी जबरदस्त व्यक्ति होती त्याचं वर्णन केलं, आणि अशा अधिकारी गवयाकडून विद्या संपादन केल्याबद्दल बुवाची पाठ थोपटली. पटदीपक रागातलं ते ध्रुपद विलायतखाँसाहेबाना इतकं पसंत पडलं की 'साचि गुननकी सेवा करत वोही' अशा आरंभाची जी चीज जगन्नाथबुवाना उद्देशून त्यानी बांधली ती या ध्रुपदाच्याच चालीवरची होती.

गुलाम महंमद यांच्याकडून मिळविलेल्या ह्या ध्रुपदासारख्या कितीतरी एकाहून एक अधिक मूल्यवान अशा चिजा बुवांच्या संग्रही असतील की त्यापैकी एकेकीच्या मागे बुवांच्या धडपडीचा, कुणा तरी उस्तादाची त्यानी सेवा केली असेल त्या सेवेचा, आणि लौकिक सन्मानाच्या साऱ्या कल्पना बाजूस टाकून उपसलेल्या शरीर कष्टाचा मनोरंजक आणि उद्बोधक इतिहास असेल. ब्रह्मपदी नाचायचं असेल तर 'लोखंडाचे चणे' खावे लागतात याचा विसर या गृहस्थानं स्वतःला कधी पडू दिला नाही. विलायतखाँसाहेब हे बुवांचं परम दैवत. परंतु विद्या आणि कला हे बुवांचे दोन ध्यास असे जबरदस्त की इतर घराण्यांच्या गायकीचे आचार्य त्याना जिथे जिथे जेव्हा जेव्हा दिसले, तिथे तिथे आणि तेव्हा तेव्हा त्यानी आपल्या सेवाधर्माचं भांडवल खर्चिलं, आणि प्रत्येकापासून काहीना काही तरी मिळविलं. मुंगीला साखर हवी असते. ती साखर कुणाच्या घरातली आहे याचा विचार ती करीत नाही. साखरेचा दाणा दिसला की त्याचा संग्रह करायचा येवढंच तिला माहीत असतं. जगन्नाथबुवांची गोष्ट अशापैकीच म्हणावी लागेल. ते गोत्र सांगतात विलायतखाँसाहेबांच्या आग्रा घराण्याचं. परंतु इतर घराण्यांची विद्या त्यानी कधी वर्ज्य मानली नाही. कराडे ब्राह्मणाच्या कुळात जन्म पावलेल्या या कलावंताचं खरं गोत्र आहे संगीतविद्येचं! याच्या मनातली सगळ्यात मोठी निष्ठा आहे कलेची! कलेच्या संचयाची! आणि कलेच्या प्रचाराची!

१९३९ साली म्हैसूरच्या युवराजानी इंग्लंड-युरोपची यात्रा करण्याचं ठरविलं. केवळ मजेनं सहल करण्याच्या हेतूनं नव्हे, तर तिकडच्या लोकांना भारतीय संगीत ऐकविण्याच्या हेतूने...या हेतूच्या सिद्धतेसाठी त्यानी श्री. गोविंदराव टेंबे याना बरोबर घेतलं, आणि गायकवादकांची निवड करण्याच्या बाबतीत त्याना सर्वाधिकार दिले. गोविंदरावानी जे कलावंत निवडले त्यात



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. 78628

जगन्नाथबुवांचा आवर्जून अंतर्भाव केला. विलायतची यात्रा करण्याचा योग बुवांच्या ध्यानीमनींहि नसताना आला. या महायात्रेच्या आठवणी फारशा सुखाच्या ठरल्या नाहीत....परंतु बुवांचा ठेंव्यांविषयीचा आदर इतका मोठा की युरोपच्या त्या दौऱ्यातील अनुभव ते सहसा कुणाजवळ सांगत नाहीत. परंतु ते अनुभव भले बुरे कसेहि असोत, येवढं खचित की या प्रवासात तिकडच्या संगीत दुनियेचं जे दर्शन बुवाना घडलं, त्यामुळे त्यांची काही प्रश्नाविषयीची दृष्टि उदार आणि विशाल झाली. रोम शहरातल्या वास्तव्यात एका 'संगीतिके'च्या प्रयोगाच्या वेळेस एक हजार वाद्यांचा ऑर्केस्ट्रा त्याना ऐकायला मिळाला, तो ऐकून ते स्तिमित तर झालेच, परंतु शिवाय त्यांच्या मनात अनेक प्रश्नहि घोळू लागले....हार्मनीच्या तत्वाचा वापर करण्याचं कौशल्य पाश्चात्यानी केवढ्या पराकोटीला नेलं होतं आणि संगीतात केवढी भव्यता निर्माण केली होती? या कौशल्याचा भारतीय संगीतात, त्याचं परंपरागत अस्सल स्वरूप बिघडू न देता अंतर्भाव करायला नको काय? करायचा झाला तर कोणती पथ्यं सांभाळली पाहिजेत? या प्रश्नांचा जगन्नाथबुवा आपल्या मनाशी विचार करू लागले.

बुवांच्या ठिकाणचे दोन गुण मला फार आवडतात. एक गुण असा की त्यानी जुनी विद्या संपादन करण्यात कष्टांची परिसीमा तर गाठलीच, परंतु जीर्ण सनातनी मताचा आंधळेपणा त्यानी आपल्या अंगी येऊ दिला नाही. काळाच्या प्रवाहाबरोबर आणि नव्या परिस्थितीबरोबर पुढे पुढे जाण्याची तयारी त्यानी ठेवली. 'जुनं ते सोनं' असं तर त्यानी मानलंच, जुनी विद्या तर त्यानी आत्मसात केलीच, पण शिवाय नव्या मतांचा, केवळ ती नवी म्हणून, अव्हेर न करण्याची दक्षता त्यानी ठेवली. नव्या मतप्रवाहात ग्राह्य भाग किती आणि कोणता याचं चिंतन करण्याचा मनाचा खुलेपणा त्यानी जोपासिला. आणि त्यांचा दुसरा गुण असा की त्यानी आपल्या अभिरुचीत आणि आवडीनिवडीत एकांगीपणा येऊ दिला नाही. त्यांची अभिरुची औरस-चौरस आहे.

सुमारे सदतीस वर्षांपूर्वी 'संगीतातील नवमतवाद' जेव्हा गाजला तेव्हा कलाकारात आणि जाणत्या लोकात दोन तट निर्माण झाले होते. नवमतवादी लोकांचं म्हणणं होतं, की भारतीय संगीताची प्रवृत्ती स्वरनिष्ठ आहे खरी, एक प्रकारचा आनंद देण्याचं सामर्थ्य केवळ स्वरनिष्ठ गाण्यातहि आहे खरं, परंतु

शब्द, त्यांचा अर्थ, आणि त्यातील भावना, यांचं महत्त्व फार आहे, आणि गायक जेव्हा शब्दांचा आश्रय घेतो तेव्हा अर्थाच्या आणि भावनेच्या सौंदर्याची मजा त्यानं स्वतः घेतली पाहिजे, आणि श्रोत्यापर्यंत ती पोचविली पाहिजे. संगीताचं मराठीकरण झालं पाहिजे. आणि 'मेलडी' हे जरी भारतीय संगीतातलं प्रधान तत्त्व असलं तरी पाश्चात्य संगीतातल्या 'हार्मनी'चा कौशल्यपूर्ण वापर केल्यास भारतीय संगीताची रंजकता वाढण्यासारखी आहे. भारतीय संगीत केवळ व्यक्तिनिष्ठ होऊन बसलं आहे, त्यात समूहनिष्ठा यावी यासाठी, आणि आधुनिक काळातल्या नव्या गरजा भागविण्यासाठी, भारतीय 'संगीतकारानी हार्मनीचा स्वीकार केला पाहिजे. निदान या बाबतीत नवे प्रयोग झाले पाहिजेत....संगीतातील या नवमतवादाला सनातनी मंडळीनी कडाडून विरोध केला होता. या मंडळीत श्री. गोविंदराव टेंबे यांच्यासारख्या काही व्यक्ति अशा होत्या की ज्यांच्याविषयी जगन्नाथबुवांच्या मनात पराकोटीचा आदर होता. गाढ निष्ठा होती. परंतु या आदरामुळे आणि निष्ठेमुळे बुवानी स्वतःला आंधळेपणा येऊ दिला नाही. सत्याविषयीच्या निष्ठेला सगळ्यात अग्रस्थान द्यावं लागतं, हा विवेक त्यानी ढळू दिला नाही. नवमतवाद्यांच्या प्रतिपादनातला ग्राह्यभाग त्याना समजला, पटला, आणि त्या मतांचा पुरस्कार त्यांच्या बोलण्यात आणि आचरणात दिसू लागला....या विषयावर ते वाद करू लागले की त्यांच्या बोलण्यातली हिरीरी तर लक्षणीय असतेच, परंतु शिवाय त्यांचं प्रतिपादनाचं कौशल्य, आणि आवेशयुक्त भाषा याकडे पाहिलं तर हा माणूस जेमतेम फक्त दोनच इयत्ता शिकलेला आहे या गोष्टीवर विश्वास बसत नाही. त्यांच्या विवादपटुत्वाबद्दल कौतुकाची आणि आदराची भावन उचंबळून आल्याखेरीज राहात नाही.

बुवांच्या पत्रिकेत शालेय शिक्षणाचा योग नव्हता. परंतु सुशिक्षितपणा आणि सुसंस्कृतपणा शाळा-कॉलेजांच्या बाजारातच विकत मिळतो असं नव्हे. त्या गुणाची ज्याला आंतरिक ओढ आहे त्याला तो शाळा-कॉलेजात न जाता देखील पैदा करता येतो. बुवानी तो पैदा केला आहे. वाचनाची गोडी त्यानी स्वतःला लावून घेतली आहे. आज घटकेच्या बहुतेक साऱ्या अग्रेसर लेखकांच्या साहित्याशी त्यांचा परिचय आहे. प्रमुख मासिकातून येणारे संगीतविषयक लेख तर ते आवर्जून वाचतातच, परंतु शिवाय इतर विषयांवरचं लिखाणदेखील ते नजरेखालून घालतात. जगातल्या घडामोडी समजाव्या,

राजकारण, धर्मकारण, समाजकारण, अशा सर्व क्षेत्रात घडणाऱ्या लहानमोठ्या घटनांकडे लक्ष ठेवावं, अशी त्यांच्या मनाची ओढ आहे. यासाठी वृत्तपत्रवाचन ही त्यांच्या दिनक्रमातली एक महत्त्वाची गोष्ट आहे. चीनचे आणि भारताचे संबंध, रशिया आणि अमेरिका यात सुरू असलेली रस्सीखेच, आकाशयानांची उड्डाणं, अण्वस्त्रांची शर्यत, अशा घडामोडीकडे लक्ष पुरविणाऱ्या किती व्यक्ती गायकवादकांच्या जगात सापडतील? परंतु जगन्नाथबुवा इतर सामान्य कलावंताप्रमाणे कूपमंडूकवृत्तीचे नाहीत. बावीस श्रुतींच्या ब्रह्मानंदात मग्न राहाण्याची विद्या त्यानी संपादन केली असली, तरी एकूण मानवी जातीच्या दैनंदिन संसारात वादी संवादी स्वरांची जी उलटापालट घडत असते, आणि कधी कर्णमधुर, कधी कर्णकटु, कधी सुरेल, कधी बेसूर असं जे संगीत निर्माण होत असतं, ते देखील समजून घ्यायला हवं असं त्याना वाटतं. थोड्याच दिवसांपूर्वी क्रुश्चेव्ह पदच्युत झाल्याची बातमी वृत्तपत्रात फडकली तेव्हा ती वाचून बुवा स्वस्थ बसले नाहीत, तर रशियाच्या राज्यपद्धतीचं गूढ समजावं म्हणून ज्या त्या मित्राला प्रश्न विचारून ते हैराण करीत राहिले....

बुवानी आपली चवकसबुद्धी जशी सतत धार लावून तीक्ष्ण ठेवली आहे, त्याप्रमाणेच स्वतःच्या अभिरुचीवर एकांगीपणाचा गंज चढणार नाही याची काळजी घेतली आहे.....संगीत नाटक पाहाण्याची गोडी त्याना आहे. चित्रपट पाहाण्याची हौस आहे. जुन्या काळातले जुन्या नाटकांचे प्रयोग पुष्कळ पाहिले, आता त्यांचे प्रयोग पाहावेसे वाटावे अशी कलावंत माणसं उरली आहेत कुठे, अशा विचारानं त्यानी आपली गोडी आंबू दिलेली नाही. 'सौभद्र', 'स्वयंवर', 'मानापमान', 'मृच्छकटिक', या जुन्या नाटकांच्या प्रयोगांप्रमाणेच 'पंडितराज जगन्नाथ', 'मंदारमाला', 'मत्स्यगंधा', अशा नव्या नाटकांचे प्रयोगदेखील त्यानी बघितले आहेत आणि त्यातल्या पद्यभागाचं कौतुक केलं आहे. 'पदाचा प्रसंग, शब्दार्थ, बांधणी, रस, लय, या साऱ्या गोष्टी अनुरूप असल्या की रसोत्पत्ती होते, आणि ते गाणं आठवणीत राहातं. ह्यात जुन्यानव्याचा प्रश्न नाही' असं ते म्हणतात....चित्रपट संगीतानं लोकांची अभिरुची बिघडविली असा सरसकट आरोप बुवा करीत नाहीत. चित्रपट संगीताच्या निर्मात्यांचं देखील गुणग्रहण करण्यात ते तत्पर असतात. रागदारीवर आधारित असलेल्या चित्रपटातल्या चाली त्याना अधिक आवडतात. 'धीरेसे आजारी निंदिया' हे सी. रामचंद्र यांचं अंगाईतगीत, नौशाद यांची 'रतन' मधली गाणी, 'जनम जनम के फेरे'

मधली भजनं आणि भैरवी त्याना फार आवडल्याचं ते सांगतात....एखाद्या दुकानात लागलेली मुद्रिका रस्त्यानं जाता जाता त्यानी ऐकली आणि एखादी जागा त्याना विशेष वाटली तर ते दुकानात जाऊन चार आणे देऊन ती ध्वनिमुद्रिका मुद्दाम ऐकल्याशिवाय राहणार नाहीत. लता, आशा, मधुबाला, जव्हेरी या त्यांच्या आवडत्या गायिका होत.

पाश्चात्य संगीताच्या सुरावर, ते केवळ परकीय आहेत म्हणून, बहिष्कार घालावा असं त्याना वाटत नाही. मात्र त्यांचं म्हणणं येवढंच की हा प्रयोग नेहमीच जमतो असं नाही. सुगम संगीतात अशी 'कलमबाजी' करण्यास विशेष वाव आहे असं त्याना वाटतं. बडे गुलाब अली, आणि नजाकत अली यानी इजिप्शिअन संगीत आपल्या संगीतात आणण्याचा जो प्रयोग केला आहे, तो त्याना यशस्वी वाटतो....ते आवर्जून सांगतात 'खाँसाहेब बडे गुलामअली' यांची 'झिंदडी लुटी' ही मुलतानी काफीतली रेकॉर्ड अवश्य ऐका. नजाकत अलीनी पहाडी आणि भैरवीमधे अशीच गंमत केली आहे, तीहि ऐका.'

कलावंत म्हटला की तो लहरी आणि व्यसनी असायला हवा अशी सामान्य समजूत आहे. लहरीपणा आणि व्यसनीपणा अंगी आणल्या खेरीज लोक आपल्याला कलावंत म्हणणार नाहीत अशा मूर्ख हिशोबानं वागणारे, आणि विद्येपेक्षा या बाह्य उपाधींची अधिक जोपासना करणारे, कितीक उदयोन्मुख कलावंत मी बघितले आहेत. त्यांच्या चरित्राच्या शोकांतिका माझ्या नजरेसमोर घडल्या आहेत. परंतु या बाबतीत बुवानी विलक्षण सावधपणा दाखविला आहे. मद्यसेवनापासून ते सर्वस्वी अलिप्त राहिले आहेत. इंग्लंड-युरोपच्या दौऱ्यात म्हैसूरच्या युवराजानी आणि गोविंदराव टेंब्यानी त्याना कितीक वेळा आग्रह केला, थंडीनं मराल म्हणून सांगितलं, परंतु बुवानी आपला निग्रह ढळू दिला नाही. (तिकडच्या जबरदस्त थंडीत देखील त्यांचं स्नान कधी चुकलं नाही!) १९३६ साली गणेश चतुर्थीच्या दिवशी तिरखवा खाँसाहेब आणि बशीरखाँसाहेब यानी बुवाना जबरदस्तीनं मद्य पाजण्याचा प्रयत्न केला. परंतु मी त्यांच्याशी झटापट करून कसाबसा पळून गेलो'....पूर्वी बुवा विडी सिगरेट ओढीत असत परंतु चार वर्षांपूर्वी आवाजाकरिता ऑपरेशन केल्यापासून त्यानी धूम्रपानहि सोडून दिलेलं आहे. आता ते दिवसातून सात आठ वेळा पान तंबाखू खातात. शिकवणीला बसले की समोर तबक सज्ज असायला हवं!

मद्यान्नव्रतचा बुवांचा हा निग्रह विशेष कौतुकास्पद म्हटला पाहिजे तो अशासाठी, की विद्याप्राप्तीसाठी सेवा करताना त्यानी अगणित प्रसंगी गुरुजनांना मद्याचा नैवेद्य दाखविला. गुलाममहंमदसारख्या कलावंताची भांग, गांजा, चंडोल, अशा मादक पदार्थांची गरज भागविली. चंडोलाच्या गोळ्या तयार करण्याची प्रक्रिया मोठी जिकीरीची आणि कष्टाची. परंतु ती त्यानी शिकून घेतली. एखाद्या दुबळ्या मनाच्या माणसाला साहजिक मोह झाला असता की या अमली पदार्थांची लज्जत एकदा गमतीनं चाखावी तरी. परंतु या पदार्थांना बुवानी स्पर्श केला तो केवळ गुरूच्या सेवेत उणेपणा राहू नये म्हणून! गुरूची मर्जी संपादन करण्यासाठी! विद्येच्या प्राप्तीसाठी!... संजीवनीविद्या प्राप्त करून घेण्यासाठी शुक्राचार्यांकडे राहूनहि स्वतःचं शील आणि सत्त्व संभाळणाऱ्या कचाप्रमाणे बुवानी स्वतःचं चारित्र्य शुद्ध ठेवले आहे....त्यानी लग्न केललं नाही. संगीतविद्या आणि कला हाच आपला संसार मानला आहे आणि विशेष हे की जिथे चहूकडे नित्य मोह पसरलेले असतात अशा वातावरणात वावरत असताना देखील प्रेमाच्या भानगडीत ते कधी पडले नाहीत. गुरु या दृष्टीनं त्यांच्या ज्ञानभांडाराविषयीं आणि अध्यापन-कौशल्याविषयी त्यांच्या छात्रगणातील पुरुषांच्या आणि स्त्रियांच्या ठिकाणी जसा आदर आहे, त्याचप्रमाणे त्यांच्या विशुद्ध चारित्र्याविषयी देखील आहे.

शिष्यवर्गाचं अलोट प्रेम बुवांनी संपादिलं आहे त्याला बुवांच्या अंगचा आणखी एक गुण कारण आहे. लहरीपणा आणि अनियमितपणा या दोन गोष्टींचा बुवांनी स्वतःला संपर्क होऊ दिलेला नाही. गाण्यावाजविण्याच्या जगात असा अलिखित संकेत बहुधा मानला जातो की तालमीचा दिवस आणि वेळ यांचं बंधन तालीम देणाऱ्या वस्तादानं मानायचं नसतं. तालमीला बसल्यावर देखील वस्तादांचीं लहर लागली तर त्यांनी शिकवायचं. शिकवणी बाजूलाच ठेवून त्यानी आलतू फालतू गप्पा मारल्या, चहा फराळ केला, पानतंबाखू खाऊन आणि सिगरेटा ओढून ओढून तस्त आणि रक्षापात्र भरून टाकलं तरी शिष्यानं आणि शिष्येनं तक्रार करायची नाही. गाण्याची तालीम म्हटली की असंच चालायचं, अशा समजुतीनं शिष्यानं वागायचं असतं. परंतु असा लहरीपणा जगन्नाथबुवाना ठाऊक नाही.

बुवा शिकवणीला बसले की जी रागिणी शिकवायची असेल तिचं खास स्वरूप शिकणाराला समजलं पाहिजे, जो ख्याल ते सांगत असतील त्याची शुद्ध

संहिता शिष्याच्या तोंडी बसली पाहिजे, चिजेचा शब्दार्थ आणि भावना याकडे शिष्याचं पूर्ण लक्ष राहिलं पाहिजे, या गोष्टीवर बुवांचा फार कटाक्ष असतो. समोर शिकवायला बसलेल्या शिष्याच्या गळ्यातून अमुक एक तान, बोलतान, उपज किंवा हरकत अत्यंत निर्मळ आणि गोंडस स्वरूपात आपल्याला काढायची आहे येवढ्या एकाच गोष्टीवर त्यांचं सारं लक्ष केंद्रित झालेलं असतं, आणि या बाबतींत स्वतःचं पूर्ण समाधान झाल्याखेरीज ते यत्किंचितदेखील कंटाळा न करता त्या त्या जागेची मेहनत शिष्याकडून करवून घेतात. जी मूर्ति दगडांत कोरावयाची असेल ती मनपसंत कोरण्यासाठी खोदकाम घासकाम करणाऱ्या एखाद्या शिल्पकाराप्रमाणे शिष्याच्या गळ्यावर अवश्य ते संस्कार करण्यासाठी बुवांची परोपरीची खटपट चालू असते. एखादी अवघड जागा घेताना शिष्यानं नाऊमेद होऊ नये म्हणून ते त्याला चुचकारीत असतात, चूक दाखवीत असतात, पुनःपुन्हा तीच जागा घोटून घेत असतात, आणि अखेर हवी ती जागा हवी तशी निघाली की 'हां ! ये है !' अशी शाबासकी देत असतात. बुवा कुणाला तालीम देत असले की ते एकंदर दृश्य मोठं लोभसवाणं असतं. आपली तब्येत बरी नाही, आपल्याला थकवा आला आहे, सर्दी खोकला झाला आहे, असल्या अडचणी आणि तक्रारी ते पार विसरून जातात. प्राण ओतून शिकविण्याचं बुवांचं कसब बघितलं म्हणजे पहाणारा स्तिमित झाल्यावाचून रहात नाही. आळस आणि कृपणपणा या दोन दुर्गुणांचा स्पर्श बुवांच्या अध्यापनाला चुकून देखील होत नाही. 'आपणासारिखे करिती तात्काळ' असा गुण तर जगन्नाथबुवांच्या ठिकाणी आहेच. परंतु शिष्य आपल्यापेक्षाहि सवाई व्हावा अशा जिदीनं ते शिष्याचं गाणं घडवीत असतात. आज बुवांच्या चिजा आणि त्यांनी बनविलेल्या राग-रचना त्यांचे काही शिष्यच त्यांच्याहि पेक्षा अधिक तयारीनं गातांना आढळतात, याचं मर्म बुवांच्या असामान्य अध्यापन कौशल्यात आहे.

आळस आणि लहरीपणा यापासून बुवांचं अध्यापनच नव्हे तर त्यांचा एकूण स्वभावच पूर्णतः अलिप्त आहे. त्यांचा एकंदर दिनक्रम लहरी कलावंताचा नसून प्रतिज्ञाबद्ध साधकाचा आहे. पहाटे पाच वाजता ते उठतात आणि त्या प्रहरापासून रात्री निद्रेची वेळ होईपर्यंत त्यांचा सर्व कार्यक्रम अत्यंत नियमितपणानं, सुतानं बांधल्यासारखा चालतो. त्यांचं देवदर्शन कधी चुकत नाही. गणपति हे त्यांचं उपास्य दैवत. त्याची पूजा ते रोज करतात. मनाचे

श्लोक, करुणाष्टकं यांचं पठण करतात. 'गणपति हे माझं दैवत असलं तरी संकटाची चाहूल लागली की शनीच्या भेटीला जातो' असं बुवा सांगतात. दसऱ्याच्या दिवशी बुवा वाद्यपूजा करतात आणि त्यांच्या मित्रांचा आणि शिष्यांचा परिवार त्यांच्या घरी जमतो आणि एक संमेलनच साजरं होतं.

जगन्नाथबुवा पुरोहित हे एक मोठे गायक आहेत, परंतु गवयाची आणि वस्तादाची जी कल्पना आपण सामान्यपणे करतो ती कल्पना खोटी ठरविणारे ते आहेत. सनातनी आंधळेपणा, हट्ट, दुराग्रह, संकुचितपणा त्यांच्या ठिकाणी नाही. काळाच्या प्रवाहाबरोबर पुढे जायला ते तयार आहेत. नव्या मतातला ग्राह्यांश घ्यायला ते तत्पर आहेत. त्यानी मनाचा खुलेपणा जोपासिला आहे, या त्यांच्या गुणामुळे जसे ते निराळे वाटतात, त्याचप्रमाणें त्यांच्या अंगी आणखी एक गुण असा आहे की जो धंदेवाईक गवयाच्या बाबतीत मुळीच अपेक्षित नसतो....त्यांची अभिरुची सर्वस्पर्शी आहे, आणि त्यांच्या आवडीनिवडी उंच दर्जाच्या आहेत तशा विविधहि आहेत.

पत्ते किंवा इतर बै  खेळ त्याना आवडत नाहीत. फुरसतीच्या वेळातला त्यांचा मुख्य छंद एकच. स्वररचना करण्याचा! परंतु त्यांचं सारं जीवित व्यापून टाकणाऱ्या या छंदातूनहि ते इतर काही छंदासाठी सवड काढतात.... गुरुजनांची आणि मित्रांची जुनी पत्रं काढून वाचीत बसणं त्यांना फार आवडतं. अशी असंख्य जुनी पत्रं त्यांनी जपून ठेवली आहेत (हे देखील गवयाला न शोभणारंच!) आणि ही पत्रं ते पुनःपुन्हा वाचतात. एके काळी कुस्त्या बघण्याचा षोक त्यानी खूप केला. कल्लू, गामा व गुंगा अशा भारतीय कीर्तींच्या कुस्तीगिरांच्या इनामी कुस्त्या त्यानी आवडीने बघितल्या आहेत आणि अलीकडे मुंबईत स्थायिक झाल्यापासून फ्रीस्टाईल कुस्त्या ते सहसा चुकवीत नाहीत. मित्रांशी गप्पा मारणं, आणि फिरायला जाणं, या दोन गोष्टी त्यांच्या आवडीच्या आहेत. बहुतेक अग्रेसर साहित्यिकांच्या लिखाणाशी जसा त्यांचा परिचय आहे त्याप्रमाणे बहुतेक नामवंत व्याख्यात्यांची व्याख्यानं त्यानी ऐकलेली आहेत. नावाजलेल्या कीर्तनकारांचीं कीर्तनं ऐकण्यात ते रंगले आहेत. मद्यासारख्या रंगढंगापासून हा गृहस्थ अलिप्त राहिलेला असला तरी त्याचे म्हणून काही नाजुक षोक आहेत. स्वच्छ इस्त्री केलेल्या कपड्यांची त्याना फार आवड आहे. गवई मैफलीत बसला की त्यानं 'शुद्ध बानी, शुद्ध मुद्रा,' अशी पथ्यं संभाळली पाहिजेत, इतकंच नव्हे तर त्यानं नेहमीच, समाजात वावरताना सुप्रसन्न आणि

सुदर्शन राह्यलं पाहिजे, असा दंडक मान्य असल्याप्रमाणे बुवा वागतात. निळ्या 'सर्ज'चा कोट, चायना सिल्कचा शर्ट, स्वच्छ तलम धोतर, आणि पॉलिश केलेला बूट, अशा थाटात बुवा नेहमी वावरतात. सुगंधी अत्तरांचा त्याना षोक आहे. उंची कनोजी अत्तरं त्याना विशेष आवडतात आणि ती त्यांच्या संग्रही नेहमी असतात. 'मजमा' अत्तरावर त्यांचं खास प्रेम आहे.

जगन्नाथबुवांच्या मित्रांचा आणि छात्रांचा परिवार फार मोठा नसता तरच नवल म्हणावं लागलं असतं. मुंबईत, पुण्यात, कोल्हापुरात, समाजाच्या सर्व थरातल्या अनेक व्यक्तींशी त्यांचे जिव्हाळ्याचे स्नेहसंबंध आहेत....जिथे जिथे बुवा गेले आहेत तिथे तिथे त्यानी लोकांचा स्नेह मिळवला आहे. जिथे जिथे ते गायले तिथे तिथे त्यानी श्रोत्यांना अंकित केलं आहे... एकदा त्यांच्याशी गप्पा मारताना त्यांच्यासारख्या कलावंताला जो प्रश्न आपण नेहमीच साहजिकपणे करतो तो मी त्याना केला, 'तुमची कोणती गाणी विशेष रंगल्याची तुम्हाला आठवण आहे?' बुवानी दिलेलं उत्तर मार्मिक होतं. मोठ्या प्रमाणावर झालेल्या थाटामाटाच्या मैफली लक्षात रहाण्याजोग्या रंगतातच असं नाही. कधी कधी आपण मजेनं म्हणून कुठे तरी गायला बसतो आणि गाणं असं काही जमतं की ते गाणाऱ्याच्या आणि ऐकणाऱ्याच्या दीर्घकाल लक्षात राहावं. कोल्हापूरचे एक वकील श्री बाबूराव जोशी यांच्या घरची मैफल बुवाना आठवते. सकाळच्या त्या मैफलीत 'ललत' मधला 'रैनका सपना' हा ख्याल बुवा फार जमून गायले. बुवांना दुसरी एक अशीच मैफल आठवते ती प्रो. बी. आर. देवधर यांच्या विद्यालयात १९५३ सालच्या पलुस्कर वार्षिक पुण्यतिथीच्या उत्सवात ते गायले तेव्हाची. 'पूर्वी' रागातला 'दिलिया नगरमे' हा ख्याल त्यानी फार जमून म्हटला होता. १९४४ साली कोल्हापूरच्या देवल क्लबाचा 'हीरकमहोत्सव' मोठ्या थाटामाटात झाला. तेव्हा एकदा जगन्नाथबुवा देवलक्लबांत गायला बसले होते. फैयाज खाँ, अजमत हुसेनखाँ, भूर्जी खाँ, गोविंदराव टेंबे, बापूराव शाळिग्राम, बापूराव दिंडे अशी मंडळी समोर बसली होती. (मी हि होतो!) त्यावेळी बुवानी गायलेला 'शिवमत भैरव' अजूनही माझ्या कानात घुमत आहे!....

जगन्नाथबुवांचा आवाज काहीसा घोगरा आहे. त्यांच्या आवाजात चापल्य जात्याच कमी आहे. परंतु एखादा ख्याल सुरू करून आलापीच्या अंगानं ते रागिणी भरू लागले की मैफल त्यांच्या स्वाधीन होते. शब्दार्थ

आणि भावना यांचं महत्त्व मानणारा हा गायक आहे याचा प्रत्यय श्रोत्याना तबडतोब येतो. त्यांच्या कंठातून निघणाऱ्या प्रत्येक स्वरात भावना उतू जात असते. त्यांच्या गायकीची तऱ्हा धृपद–धमाराशी जवळीक सांगणारी आहे. लयकारी म्हणजे त्यांच्या कौशल्याचं खास वैशिष्ट्य असल्यामुळे त्यांच्या गाण्यात बोलतानांची खैरात होत असते. बुवांच्या चिजांची बांधणीच अशी बंदिस्त आणि रसेली असते की त्यानी अस्ताई अंतरा म्हटल्याबरोबर श्रोत्यांच्या चित्तवृत्ती हेलावतात. जोगकंस, स्वानंदी, यासारखे बुवानी स्वतः रचना केलेले राग ते गाऊ लागले की श्रोते मंत्रमुग्ध होतातच, परंतु भैरव भटीयार, अहीर भैरव, मधुवंती, चंद्रकंस, धनाश्री, ललत, मुलतानी अशा रागातले ख्याल बुवा गाऊ लागले की त्यांच्या गायनातून रसधारा वाहू लागतात, श्रोत्यांच्या भावना उचंबळून ओघळणाऱ्या अश्रुधारा अनावर होतात, अभिजात गायनाच्या अवर्णनीय आनंदात श्रोत्यांचं भान हरपून जातं!

जगन्नाथबुवानी विद्यासंपादन करताना जसे आपार कष्ट केले त्याचप्रमाणे विद्यादान करतानाहि त्यानी पराकोटीचं औदार्य दाखविलं. 'खाँसाहेबासारखा विद्येचा दाता दुसरा कुणी नसेल' अशी विलायत खाँसाहेबांची यथोचित कीर्ती होती. गुरूच्या या कीर्तीची परंपरा अगन्नाथबुवानी पुढे चालविली आहे.... साहजिकच त्यांच्या शिष्यांचा परिवार मोठा आहे. बुवांची तालीम ज्यानी घेतली आणि कमीअधिक कीर्ती मिळविली अशांचा नामनिर्देश करताना एखाद्या व्यक्तीचा उल्लेख चुकून राहाण्याचा धोका असतो. परंतु तो पत्करूनहि काही नावं सांगावीशी वाटतात. राम मराठे, माणिक वर्मा, सी. आर. व्यास, जितेंद्र अभिषेकी, सुरेश हळदणकर, मोहनतारा अजिंक्य, डॉ. फळणीकर, यशवंत जोशी, जे. एल्. रानडे, जी. एन. जोशी, सिंधु शिरोडकर, विमल वाकडे, मालती पांडे, वसंतराव कुलकर्णी, बालकराम, गुंडूबुवा अत्याळकर, लीला करंबळेकर, मनोरमा वागळे, पूर्णिमा तळवलकर, गुलाब अकोलकर, सुलोचना सांगावकर, गुलाब शहा, केशव धर्माधिकारी, बाळासाहेब राजाज्ञे, जिनेंद्र धनाल, प्रभुदेव सरदार, मदन बोंगाळे, सरलाबाई जोशीराव, या मंडळीनी जगन्नाथबुवांकडून साक्षात् तालीम घेतली आहे आणि विशेष हे की त्यानी दर्जेदार कलावंत म्हणून कमीअधिक लौकिक मिळविला आहे. माणिक वर्मा, जितेंद्र अभिषेकी, राम मराठे, सी. आर. व्यास, सुरेश हळदणकर, अशासारख्या काहीनी तर मैफलबाज मोठ्या गायकांच्या रांगेत स्थान मिळविलेलं आहे.

